अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २५८ ■ शुक्रवार दि.६ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 258 ■ Friday Dt.6 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी
भारतीय हवामान विभागाने जाहीर केलेल्या ताज्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात जून महिन्यात मान्सूनपूर्व पावसाची स्थिती सक्रिय होत असून अनेक भागांत पुढील काही दिवसांत विजांसह मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि कोकण विभागात ७ ते १० जूनदरम्यान पावसाचा जोर अधिक राहील.
बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात ढगाळ हवामान, गडगडाट वाऱ्यासह पाऊस, आणि काही भागांत विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातही हलक्या सरी सुरू होण्याचा अंदाज आहे. खरीप हंगामाच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस महत्त्वाचा मानला जातो. मात्र, हवामानातील अनिश्चितता लक्षात घेता पेरणीस घाई न करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.
राज्य सरकारने आपत्कालीन यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश दिले असून नागरिकांनी हवामान खात्याच्या इशाऱ्यांकडे लक्ष ठेवण्याचे आवाहन केले आहे. मराठवाड्यात आगामी काही दिवसांत पावसाच्या सुस्पष्ट हालचाली पाहायला मिळणार असून हवामान विभागाने जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः बीड, लातूर, हिंगोली, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये पुढील तीन ते चार दिवसांमध्ये विजांसह मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
पान २ वर

# बीड शहरातील अर्धवट रस्त्यांच्या कामामुळे नागरिक त्रस्त, धुळीचे साम्राज्य आणि चिखलाचे संकट

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहरवासीय झाले हैराण?

### आ.संदीप क्षीरसागर आणि मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष नसल्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण?

बीड । प्रतिनिधी
बीड शहरातील रस्त्यांचे काम सध्या संथगतीने होत आहे. यामुळे सामान्य नागरिकांचा, वाहनधारकांचा रोजचा प्रवास जीवघेणा ठरत आहे. अंबिका चौक ते कार्तिक लॉज रस्ता अर्धवट स्थितीत आहे. जालना रोडच्या बाजूचे साईड पट्टे न बुजवल्याने वाहन रस्त्याच्या खाली घेताना घसरून पडत आहेत. रस्त्याच्या खाली गेलेल्या वाहनाच्या टायरला चिखल लागून रस्त्यावर आल्याने शहरात प्रचंड धूळ उडत आहे.
नगर रोडवरील काम दोन वर्षांपासून अर्धवटच आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात गेली चार महिने खोदकाम सुरू आहे. मात्र, अद्याप ते पूर्ण झाले नाही. यामुळे या परिसरात वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी धुळीचे साम्राज्य पसरले आहे. कारंजा रोड, तहसील कार्यालयाच्या मागील बारकुल हॉस्पिटल रोड आणि जिल्हा क्रीडा संकुल ते सुभाष रोड या महत्वाच्या रस्त्यांचीही अवस्था अशीच बिकट आहे. सर्वत्र अर्धवट काम, खड्डे, धूळ आणि पाण्याचा अडथळा यामुळे रस्ते वाहतुकीसाठी धोकादायक झाले आहेत. शहरातील विविध भागांतील नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत असल्या तरी, बीड नगर परिषद प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडून कुठलीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. मुख्याधिकारी नीता अंधारे आणि आमदार संदीप क्षीरसागर यांचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष नसल्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.







## बीडमध्ये उभारणार सहकार संकुल; १४ कोटी ९८ लाखांची प्रशासकीय मान्यता

### युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार

बीड । प्रतिनिधी
बीड शहरातील नगर भूमापन क्र.१७९९ या मालकीच्या जागेवर 'सहकार संकुल' इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे १४ कोटी ९८ लाख रुपये इतक्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाकडून बुधवारी (दि.४) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.



जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय व इतर सहकारी संस्थांच्या क्षेत्रीय कार्यालयांना आता एकाच छताखाली आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. बीडमध्ये सध्या जिल्हा उपनिबंधक कार्यालय हे जालना रोडवरील सहकार शक्ती इमारतीत भाडेतत्त्वावर कार्यरत आहे. यासाठी मोठा शासकीय निधी वार्षिक भाड्यापोटी खर्ची पडतो. हा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी आणि कार्यप्रणाली अधिक सुसुत्र करण्यासाठी सर्व सहकारी कार्यालये एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या सहकार संकुलामुळे शासकीय खर्च वाचणार असून नागरिकांसाठी एकाच ठिकाणी सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, अनेक वर्षांपासूनचा सहकार संकुलाचा प्रश्न मार्गी लागला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील झाडावर वारकऱ्यांचं भजन



बीड । प्रतिनिधी
केज तालुक्यातील सासुरा येथील एकनाथ महाराज मठ संस्थानात अपहार झाला असून या प्रकरणी मठाधिपती व सचिवाची चौकशी करावी या मागणीसाठी गेल्या दोन दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू आहे. आपल्या आंदोलनाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत उपोषण करणारे काही भक्त झाडावर चढून बसल्याने प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती.
केज तालुक्यात असलेल्या सासुरा येथील एकनाथ महाराज मठ संस्थानात गैर व्यवहार झाला. मठाधिपती रतन महाराज उर्फ रतन दत्तोबा मुंडे
पान २ वर

### महायुती सरकारच्या फसव्या घोषणेच्या विरोधात

## शिवसेनेचे क्या हुवा तेरा वादा आंदोलन : उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी
राज्यात सत्ता मिळवण्यासाठी महायुती सरकारने निवडणूक प्रचारात अनेक फसव्या घोषणांचा पाऊस पाडला होता, पण सत्ता मिळताच या घोषणांकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले. महायुती सरकारच्या या फसवेगिरीचा जाब विचारण्यासाठी शिवसेनेचे ५ जून ते १२ जून पर्यंत क्या हुवा तेरा वादा असा प्रश्न करून गेंड्याची कातडी पांघरलेल्या महायुती सरकार ला जाब विचारणार असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे.



गेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून शेतकरी सन्मान योजनेतून १५ हजार रुपये देऊ, लाडक्या बहिणींना १५०० रुपयात वाढ करून २१०० रुपये देऊ, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील डत्रढ्ढ अनुदानाच्या स्वरूपात परत करू, वृध्द पेन्शन धारकांना २१०० रुपये देऊ, शेतीला २४ तास वीज पुरवठा करू, शेती मालाला परवडेल असा हमीभाव देऊ, बी बियाणे आणि खताचे भाव कमी करू, अशा प्रकारच्या अनेक फसव्या घोषणा करून महायुती ने शेतकऱ्यांची मते लाटली, सत्ता मिळताच सोयीस्कर पणे या घोषणांकडे दुर्लक्ष केले, सत्ताधारी तिन्ही पक्षांनी शेतकऱ्यांना तात्काळ कर्ज माफी देण्याची घोषणा केली होती कर्ज माफीच्या अपेक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली, या उलट शेतकऱ्यांनी ३१ मार्च पर्यंत थकबाकी भरावी असा फतवा काढला.
आधीच नुकसानीत आलेल्या शेतकरी अजूनही आर्थिक अडचणीत सापडला त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झाली. गेल्या सात आठ महिन्यात
पान २ वर

## बकरी ईद मुबारक




**बीड ईद-उल-अजहा नमाजची वेळ**

| | |
|---|---|
| जुनी ईदगाह, इस्लामपुरा- | ८.०० |
| नवी ईदगाह, बालेपीर- | ७.३० |
| तकिया मस्जीद, खासबाग रोड- | ७.१० |
| मर्कज मस्जीद, राजुरीवेस- | ७.०० |
| जामा मस्जीद, किला मैदान- | ७.४५ |
| दर्गाह मस्जीद, बालेपीर- | ८.३० |
| मस्जिद नुसरत खानखा कौसर चौक- | ६.२० |
| केजीएन मस्जीद, शहंशाहनगर- | ८.४५ |
| कादरिया मस्जीद, बार्शी नाका- | ७.०० |
| नमरा मस्जीद, बीड- | ६.१५ |
| जामा मस्जीद, मोमीनपुरा- | ६.३० |
| जकेरिया मस्जीद, मोहंमदिया कॉ.- | ७.०० |
| कुरेशी मस्जीद, मोमीनपुरा- | ६.१५ |
| काली मस्जीद, इस्लामपुरा- | ८.३० |
| मक्का मस्जीद, मोमीनपुरा- | ६.३० |
| अहेमदिया मस्जीद, बीड मामला- | ६.२० |
| झारा मस्जीद, अजीजपुरा- | ७.०० |
| मस्जीद, कादर पाशा जुना बाजार- | ८.१५ |
| बीड मामला मस्जीद, मोमीनपुरा- | ६.१० |
| हुजरा मस्जीद, मोमीनपुरा- | ६.३० |
| अरफात मस्जिद, मासुम कॉलनी- | ६.२० |
| जामीया हसनबीन, शहंशाहवली रोड- | ६.२५ |
| मदरसा, दारुल उलुम, तेलगाव रोड- | ६.४५ |
| इज्तेमागाह मैदान, मोमीनपुरा बायपास- | ७.०० |

## अनिल जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी प्रेम शुभेच्छांचा वर्षाव!

### लाडक्या बहिणींकडून पंचवन्न दिव्यांनी औक्षण; कलाकारांनी रांगोळीतून साकारले अनिलदादांचे प्रतिबिंब





बीड । प्रतिनिधी
शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी जिल्हाभरातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मंडळींनी एकत्रित येऊन अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला. अनिलदादा जगताप यांनी सर्व शिवसैनिकांना बॅनरबाजी नको, गरजवंतांना मदतीचा हात द्या असे अहवान केले होते. काल दि. ४ जून रोजी अनिलदादांच्या अहवानाला प्रतिसाद देत शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी मिळून विविध ठिकाणी वृक्षारोपण, अन्नदान, अनाथ आश्रमात किराणा वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रेनकोट वाटप, गोरगरीब महिलांना साड्या वाटप तसेच रक्तदान शिबीर अशी विविध सामाजिक उपक्रम राबवत अनिलदादा जगताप यांचे अभिष्टचिंतन केले. तसेच बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सायं ५.०० वाजल्यापासून ते उशिरा रात्रीपर्यंत बीड जिल्ह्यासह बाहेरच्या जिल्ह्यातून देखील अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार मोठ्या संख्येने येत होता.

### लाडक्या बहिणींनी पंचवन्न दिव्यांनी केले अनिलदादांचे औक्षण

अनिलदादा जगताप यांच्या निवासस्थानी असंख्य महिला-भगिनींनी एकत्रित येऊन पंचवन्न दिव्यांनी अनिलदादांचे औक्षण केले. विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांनी अनिलदादा यांचा वाढदिवस साजरा होत असताना महिला-भगिनींनी अनिलदादांचे पंचवन्न दिव्यांनी केलेले औक्षण अभिष्टचिंतन सोहळ्यातील एक भावनिक क्षण ठरला.

### बीड कलाकारांच्या अद्भुत कलाकृतीतून अनिलदादांचे अनोखे अभिष्टचिंतन!

बीडमधील कलाकारांनी एकत्रित येऊन रांगोळीच्या विविध रंगातून अनिलदादा जगताप यांची हुबेहूब प्रतिमा साकारत अनिलदादांचं अनोखे अभिष्टचिंतन केले. अनिलदादांच्या वाढदिवसाच्या दिनी बीडमधील सुप्रसिद्ध रांगोळीकार अंजलीताई खोबरे यांनी अनिलदादा जगताप यांची साकारलेली रांगोळी वाढदिवसाचे मुख्य आकर्षण ठरले.



# महाराष्ट्र आधार सेना म्हणजे दीपक थोरात यांच्या सामाजिक कार्याचा चेहरा : पांडुरंग कसबे

केज । प्रतिनिधी

वयाच्या १७ व्या १८ व्या वर्षापासून स्वत:ला सामाजिक कार्यामध्ये वाहून घेतलेल्या दीपक थोरात यांनी ०५ जून २०२५ रोजी एका नव्या सामाजिक संघटनेचे सुरुवात केली. महाराष्ट्र आधार सेना ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा ही भव्य विचारसरणी घेऊन महाराष्ट्र आधार सेना येणाऱ्या काळामध्ये नक्कीच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचल्याशिवाय राहणार नाही.

अडचणीत सापडलेल्या माणसाला आपल्या माध्यमातून कशी मदत होईल याचा सतत विचार करणारे, तसेच प्रत्यक्षात त्याच पद्धतीने काम करणाऱ्या दीपक थोरात यांनी महाराष्ट्र आधार सेनेच्या माध्यमातून आपल्या सामाजिक कामाची व्याप्ती वाढवून वेळप्रसंगी अडचणी सापडलेल्या माणसाला मदत करण्यासाठी महाराष्ट्रभर असंख्य मदतगार हातांची निर्मिती करण्याचे काम या माध्यमातून होणार आहे.

दैनिक 'आरंभ' बीड या दैनिकाचे संपादक म्हणून त्यांनी आजवर अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडलेली आहे. बीडच्या निर्भीड पत्रकारितेतला मानाचा हिरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्र आधार सेनेच्या उद्घाटन प्रसंगी स्वयंस्फूर्तीने ४०० ते ५०० कार्यकर्ते बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून या कार्यक्रम प्रसंगी




बीडच्या हॉटेल नीलकमल येथे उपस्थित झाले होते. महाराष्ट्र आधार सेनेच्या उद्घाटन प्रसंगी जमलेला हा जनसमुदाय जणू काही दीपक थोरात यांच्या कामाची ओळख करून देणारा ठरला. चांगल्या वाईट काळामध्ये आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे गणेश बापू थोरात व मोहोळ मतदार संघाचे माजी आमदार रमेश कदम यांचा दिपक थोरात यांनी याप्रसंगी आवर्जून उल्लेख केला.

महाराष्ट्र आधार सेना ही सामाजिक व राजकीय संघटना असून प्रस्थापित राजकीय पक्षांसोबत हात मिळवणी करून आपला राजकीय हिस्सा मागणार आहे. स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब, मराठा आरक्षणाचे जनक स्व.विनायकरावजी मेटे साहेब, तत्कालीन बीडच्या पालकमंत्री विमलताई मुंदडा, स्व.केशरकाकू क्षीरसागर त्याचप्रमाणे स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज, मानवी हक्क अभियानाचे निर्माते ॲड. एकनाथ आव्हाड, इत्यादी महामानवांच्या विचारांना महाराष्ट्र आधार सेना समर्पित आहे असे यावेळी बोलताना दीपक थोरात यांनी म्हटले.

गट–तट, रंगभेद, जात–धर्म, उच्चनीच या सर्वांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा सर्वोच्च विचार करणारी व संकटात सापडलेल्या माणसाची सोय करणाऱ्या या आगळ्यावेगळ्या सेनेने दीपक भाऊ थोरात यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात जन्म घेतलेला आहे. येणाऱ्या ऑगस्ट महिन्यामध्ये २४२ गाड्यांच्या ताफ्यासह महाराष्ट्र आधार सेनेच्या वेगळ्या रूपाचे दर्शन महाराष्ट्राला होणार आहे. आजवरचा इतिहास आहे की, एखाद्या पक्षाची मीटिंग असो किंवा संघटनेची त्यासाठी स्वत:हून स्वयंस्फूर्तीने स्वखर्चातून कोणीही येत नाही. अमाप पैसा खर्च केल्यानंतरच माणसांची गर्दी पाहायला मिळते. परंतु एखाद्या संघटनेच्या उद्घाटन प्रसंगी स्वखर्चातून उपस्थित राहणारा एवढा मोठा जनसमुदाय पाहिल्यानंतर या महाराष्ट्र आधार सेनेचा येणाऱ्या काळामधला वेग लक्षात येतो. महाराष्ट्रामध्ये कमी कालावधीत जास्त वेगाने वाढणारी सेना म्हणून ही सेना नावलौकिक होईल यात तीळमात्र शंका नाही.

महाराष्ट्र आधार सेनेच्या उद्घाटनप्रसंगी अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या यामध्ये गणेश बापू थोरात, रणवीर पंडित, करण लोंढे, दत्ता कांबळे, लालासाहेब दुनघाव, गोपाळ धांडे, शाहीर युवराज ढगे, विलासजी बामणे, ॲड. शफिक भाई, विजय चांदणे, अभिजीत धोंडे, पांडू दादा, संतोष हातागळे, हिराबाई कांबळे इत्यादी असंख्य मान्यवरांनी उपस्थित राहून दीपक भाऊ थोरात यांच्या महाराष्ट्र आधार सेनेला शुभेच्छा दिल्या.




# शेख नवीद यांच्यावर एमपीडीएअंतर्गत झालेली कारवाई मागे घ्यावी; नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांना मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मोमीनपुरा पेठ बीड परिसरातील काही सामान्य नागरिकांनी शेख नवीद शेख चांद यांच्यावर MPDA (महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम) अंतर्गत करण्यात आलेली कारवाई ही अन्यायकारक असल्याचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केला आहे. त्यांनी ही कारवाई तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे.

पोलीस अधीक्षकांच्या शिफारसीवरून व जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून ३ जून २०२५ रोजी शेख नवीद यांना हरसूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे – जसे की विनयभंग, मारहाण, दहशत निर्माण करणे, गैरकायदेशीर जमाव, बाल लैंगिक अत्याचार, बनावट कामकाज आदींसह सात गुन्ह्यांची नोंद दाखवण्यात आली आहे. पोलीसांचे म्हणणे आहे की, स्थानिकांमध्ये त्यांच्या कृतीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र अर्जदार नागरिकांचे म्हणणे आहे की, शेख नवीद हे शिक्षित युवक असून त्यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे खोटे आहेत. ते व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये काही कौटुंबिक वाद आहेत, ज्यामध्ये तक्रारी दाखल करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते, पोलीस प्रशासनाने या तक्रारींची योग्य चौकशी न करता थेट चझऊ– अंतर्गत कारवाई केली आहे.

नागरिकांनी यापूर्वी ९ मे २०२५ व २० मे २०२५ रोजी अनुक्रमे जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद यांच्याकडे लेखी तक्रारी सादर केल्या होत्या. मात्र त्यांच्या म्हणण्यानुसार या तक्रारींची दखल न घेता कारवाई करण्यात आली आहे.

नागरिकांनी सादर केलेल्या अर्जात शेख नवीद यांच्यावर पुन्हा विचार करून MPDA अंतर्गत झालेली कारवाई मागे घेण्यात यावी, अशी विनंती केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे, अशी भावना स्थानिक नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्रात गोरक्षकाच्या नावाने मुस्लिम समाजावर अत्याचार होत असेल तर मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा : शेख युनुस

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे, मौलाना आझाद या महापुरुषांचा आहे. आणि जर इथे जाणून बुजून गोरक्षकाच्या नावाने मुसलमानांना टार्गेट करून त्यांच्यावर कोयत्याने तलवारीने अत्याचार होत असेल तर सर्वात प्रथम नितेश राणे हे सरकारमधील मंत्री असून भडकाऊ भाषण करीत आहे. स्वत:ची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी विधाने करत असतात त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. जर हे होत नसेल तर मा. मुख्यमंत्री साहेब यांचा त्यांना अप्रत्यक्षपणे पाठिंबा आहे का असे दिसून येते असे असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा. आपला भारत देश हा संविधानावर चालणारा आहे.



या देशासाठी हजारो मुसलमानाने आपली जीवाचे प्राण दिलेले आहे. काही जातीवादी संघटना जाणून बुजून केवळ जातीय व्देषातून मस्तावाल गोरक्षक मुसलमाच्या जीवावर उठल्याचे चित्र दिसून येत आहे. कसलीही खात्री न करता गोरक्षकाकडून मुसलमानावर प्राणघातक हल्ले वाढले आहे.या गोरक्षकांना सरकारी बळ असून एक प्रकारे सरकारी गुंड असल्याचेही दिसून येत आहे.अनेक ठिकाणी जनावराच्या वाहतूक करणारी वाहने अडवून मारहाण केल्याच्या घटना वाढत आहे.कोणत्याही अधिकार नसताना कायदा हातात घेतला जात आहे. व त्याच्यावर कसलीही कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे.

पोलिसाकडे तक्रार केली तर गोरक्षकाच्या बाजूने सरळ सरळ पक्षपाती भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. परंतु पोलिसांनी जात धर्म न पाहता दोषीवर कारवाई करायला हवी महाराष्ट्रात कधी दलित, कधी मुस्लिम ,कधी महिला , यांच्यावर अत्याचार होण्याचे प्रमाण वाढले आहे याला जबाबदार हे सरकार आणि गृहमंत्री हे जबाबदार आहेत महाराष्ट्राची प्रतिमा मलिन करण्याचं कारस्थान काही जातिवादी मंत्र्यांकडून होत आहे . समता,न्याय, बंधुता, यासंविधानाचच्या तत्त्वाप्रमाणे कायद्याचे राज्य चालावे अशी अपेक्षा जनतेची आहे.

पान १ वरून...

## मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता

सध्या मान्सून केरळ आणि कर्नाटकमध्ये सक्रीय असून, त्याची प्रगती अपेक्षेपेक्षा थोडी धिम्या गतीने होत आहे. मात्र, दक्षिण–पश्चिम हवेचे प्रमाण वाढत असून त्याचा प्रभाव मराठवाड्यावरही जाणवू लागला आहे. त्यामुळे १० जूननंतर मराठवाड्यात मान्सूनपूर्व सरी अधिक तीव्र होतील, असा अंदाज हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. राज्याच्या हवामानशास्त्र विभागाने मराठवाड्यातील शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. काही ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, यामुळे उभ्या पिकांचे आणि घरांची नुकसानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### हवामान बदलामुळे चिंता वाढली

हवामानातील सततच्या बदलांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन धोरण बदलत आहे. कोरडवाहू शेतीवर आधारित मराठवाड्याला पूर्वी निश्चित कालावधीत पाऊस पडत असे. मात्र, आता तो अनियमित झाल्याने पीक चक्र आणि निवड यावर परिणाम झाला आहे. हरभरा, बाजरी, तूर या पारंपरिक पिकांच्या ऐवजी काही शेतकरी सोयाबीन, मका आणि उशिरा येणारी भातशेती करतात, पण ती धोके पत्करणारी बाब आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्तरावरचे हवामान विश्लेषण महत्त्वाचे आहे. केवळ खचऊ चा अंदाज पुरेसा नसतो, स्थानिक घटकांचा अभ्यास करून शेतीचे नियोजन आवश्यक असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

### नागरिकांना सतर्कतेचा इशारा

विजेच्या गडगडाटात शेतकरी आणि नागरिकांनी झाडांखाली थांबू नये, अशा सूचना प्रशासनाने केल्या आहेत. तसेच, मोबाईल, ट्रॅक्टर व धातूच्या वस्तूंना दूर ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा गारपिटीचा इशाराही हवामान विभागाने दिला आहे.

मराठवाड्याच्या दृष्टीने येणाऱ्या काही दिवसांतला पाऊस फारच निर्णायक ठरणार आहे. खरीप हंगामाचे नियोजन, पेरणीचे वेळापत्रक, खतांची उपलब्धता आणि नैसर्गिक आपत्ती यांच्याशी संबंधित अनेक मुद्द्यांवर या पावसाचा परिणाम होईल. प्रशासन आणि शेतकरी यांनी एकत्रित प्रयत्न करून या काळात धोरणात्मक भूमिका घ्यावी लागेल. आगामी दिवसांत जर हवामान खात्याचा अंदाज अचूक ठरला, तर मराठवाड्यात यंदाचा पावसाळा समाधानकारक ठरू शकतो. मात्र, त्यासोबतच वादळी वाऱ्याचा धोका लक्षात घेऊन योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे.

## शिवसेनेचे क्या हुवा तेरा वादा आंदोलन

जवळपास १००० शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले असले तरीही महायुती सरकार मूग गिळून गप्प बसलेले आहे . अशात सरकारने शेती मालाचे हमीभाव जाहीर केला असून त्यात सोयाबीन चा हमी भाव हा गेल्या वर्षी पेक्षाही कमी दराने जाहीर करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. ऐकरुपयात विमा योजना ही बंद करण्यात आली असून शेतकऱ्यावर हा अन्याय आहे. अश्या महायुती सरकारच्या फसव्या घोषणेची त्यांना आठवण करून देण्याकरिता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने क्या हुवा तेरा वादा आंदोलन सुरू करत असून या आंदोलना अंतर्गत जिल्हाधिकारी, तहसीलदार, यांना निवेदन देणे, सत्ताधारी पक्षाच्या आमदाराना क्या हुवा तेरा वादा चे निवेदन देणे, जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, यांनी पाच गावात तीन दिवस गाव बैठक घेऊन महायुती सरकारच्या फसव्या घोषणांचा पाढा वाचणे, रस्ता रोको इत्यादी आंदोलन होणार आहे तरी या आंदोलनात सर्व शिवसेना पदाधिकारी, शेतकरी, सर्व सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील..

आणि संस्था सचिव सुशेन रामराव भोसले यांनी गैरव्यवहार केलेला आहे. दि.२ जानेवारी २०२४ रोजी सासुरा ते पंढरपुर पायी दिंडी जात असतांना जमा झालेल्या देणगी संदर्भात कोणतीही माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही. देणगी देणाऱ्यांना पावती बुक प्रिंट केलेले सही परत पावती दिली जाईल म्हणुन सांगितले. मात्र प्रत्यक्षात पावती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. सदरील मानमत्त संदर्भात माहिती जाणीवपुर्वक लपवली जात आहे. एकुणच सर्व गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्यात यावी यामागणीसाठी गेल्या दोन दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालययासमोर शांताबाई पाळवदे सह इतर भक्त आमरण उपोषण करत आहेत. आंदोलनकर्त्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आज (दि.६) शुक्रवार रोजी सकाळी चार उपोषणकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर असलेल्या झाडावर चढून टाळवाजवत भजन केले. भक्त झाडावर चढल्याने प्रशासनाची धावपळ उडाली होती. घटनास्थळी पोलीस दाखल झाले होते. दुपारी एक वाजेपर्यंत आंदोलनकर्ते झाडावरच बसून होते.

## सायं. दै. आरंभ वृत्तपत्राच्या माध्यमातून ह.भ.प.महंत पांडुरंग बाबांचा जीवन प्रवासाचा आरंभ लेख..!!

# वारकरी संप्रदायमध्ये एक वेगळी ओळख निर्माण करणारे महंत पांडुरंग महाराज शास्त्री

आवड ही सर्वांनाच असते. परंतु आवडीचे खूप अनेक प्रकार आहेत . तसेच महंत पांडुरंग महाराज यांना पहिल्या पासूनच गायनाची खूप आवड होती .पुढील माहिती आशी की,पांडुरंग बाबा यांचा जन्म वडवणी तालुक्यात ०३ जून १९९२ रोजी ढोरवाडी (धर्मापूरी) या गावी एका गरीब कुटुंबात झाला. घरची परिस्थिती हालाखीची होती. आई वडील हे शेतमजूर व सुतारकीचे काम करत होते. कालांतराने ढोरवाडी या गावातून नंतर ते मूळ पिंपळा रुई या गावी स्थलांतर झाले. हातावर पोट भरून जगणारे कुटुंब होते.परिस्थितीनुसार संघर्षाला सामोरे जाऊन गावाकडील प्रवास हा सुरूच होता. शैक्षणिक क्षेत्रामध्ये गरीब परिस्थिती असल्यामुळे बाबांचे शिक्षण हे प्राथमिक शाळा येथे पहिली ते सातवी पर्यंत पिंपळा रुई या गावी झाले.आठवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण वडवणी या ठिकाणी पुढील बी.ए. पिंपळनेर या ठिकाणी पूर्ण झाले. हे सर्व शिक्षण करत असताना घरची परिस्थिती हालगिची असल्यामुळे काम करत पूर्ण केले. पण त्यात फारसं समाधान त्यांना वाटलं नव्हतं. कष्टा शिवाय पर्याय पर्याय दिसत नव्हता. जीवनाची कृतार्थता वाटत नव्हती. जीवनाची सार्थकता ही परमार्थ शिवाय नाही. त्याच्याशिवाय आपल्याला समाधान ही प्राप्त होणार नाही. अनेक वेळा त्यांच्या मनात विचार यायचा आपण परमार्थासाठी काहीतरी केले पाहिजे. ही मनात खूप आवड होती. पण कर्म धर्म संयोगाने पूर्व पुण्याईने आई–वडिलांच्या आशीर्वादाने वडिलांची पहिली ओळख आसल्यामुळे गुरुवर्य सद्गुरु रामदास बाबा यांची भेट झाली. व नंतर सहज पंढरपूरला आषाढी वारीला दर्शनाला गेले असता सद्गुरु रामदास बाबांची पंढरपूर येथे भेट घेतली. सद्गुरू बाबांनी त्याचं वेळी सर्व चौकशी केली काय करत असतो. काय नाही शिक्षण काय म्हणतंय गुरुवर्य बाबांना महंत पांडुरंग बाबांनी त्यांचा पूर्ण परिचय दिला. रामदास बाबा हे यांच्या वडिलांना चांगलेच ओळखत होते. पांडुरंग बाबांनी महंत रामदास बाबांना मी ड्रायव्हर की ही करत असतो असं सांगितले होते.

ते म्हणाले आता तर पावसाळ्यात बंद आहे ना मग चल परतीची दिंडी आहे. दिंडीला चल असं म्हणाले मनात पांडुरंग बाबा यांच्या मनात अनेक विचार येत होते काय करावं काय नाही पण गुरुवर्य बाबांना नाही म्हणायची हिंमत होत नव्हती. क्षणभर थांबून बाबांनी गुरुवर्य बाबांना होकार दिला. दुसऱ्या दिवशी दिंडी परत निघाली पांडुरंग बाबा ही त्यांच्या शब्दाला मान देऊन निघाले. पहिला मुक्काम झाला. दुसरा मुक्काम झाला. मुक्कामाच्या ठिकाणी गुरुवर्य रामदास बाबांचे किर्तन झाले. रामदास बाबांनी अभंग घेतला होता.( सोडिला संसार माया तयावरी फार ) त्यांच्यावरील विवेचन ऐकलं आणि इतकं सुंदर किर्तन गुरुवर्य बाबांचे झाले. बोलणं सर्वसामान्यांना



कळेल असं होतं. त्याच वेळी पांडुरंग बाबांना खूप भावल मनात विचार आला की आपण आता परमार्थाशिवाय दुसरं काहीच करू नये. ती रात्र बरीच बाबांची विचारात गेली. दिंडीचा तिसरा दिवस उजडला दिंडीत भजनात चालत असताना टाळ वाजवीत चालत होते. टाळ बिनचूक वाजवत असलेला पाहून दिंडीतील वारकऱ्यांनी सांभाळून घेतलं. हरिपाठाची वेळ झाली. वारकऱ्यांनी हरिपाठ म्हणायला उत्सुक केले. तर पांडुरंग बाबा यांनी हरिपाठ म्हणले, त्यातील चाल म्हण असं दशरथ महाराज यांनी सांगितले.तेव्हा चाल बाबांनी गायली. तीच ती चाल गुरुवर्य रामदास बाबांनी ऐकली परंतु त्यावेळी काहीच न बोलता. दुसऱ्या दिवशी पांडुरंग बाबांना गुरुवर्य बाबांनी विचारलं की कुठं शिकला काय. त्याच वेळी महंत पांडुरंग बाबांनी गुरुवर्य बाबांना सांगितलं की बाबा मी गावातच वडिलांसोबत भजनाला जाऊन जाऊन शिकलो. आणि काही दिवस श्रीरंग महाराज शिकवायला गावात येत होते. असं पांडुरंग बाबा यांनी गुरुवर्य रामदास बाबा यांना सांगितले. परंतु आता ते ही येत नाहीत. यावर गुरुवर्य बाबांनी पांडुरंग बाबा यांना मग शिकायचे का असं विचारले. लगेचच पांडुरंग बाबांनी होकार दिला. त्यावेळी गुरुवर्य बाबांनी सांगितले आळंदीला जावे लागेल मी सर्व व्यवस्था करतो. जा आणि शिक्षणाची चांगली तयारी कर असे गुरुवर्य रामदास बाबा यांनी सांगितले होते. त्यावेळी पांडुरंग बाबा यांनी लगेचच होकार दिला. परंतु पांडुरंग बाबा यांच्या मनात विचार येत होते. आपली परिस्थिती नाही काही नाही कसं करावे हे विचार मनात येत होते.

आई वडिलांना विचारून सांगतो असं बाबांना उत्तर दिलं होतं. त्यावेळी गुरुवर्य बाबां बोलले की मी सांगतो तुझ्या घरच्यांना असं गुरुवर्य रामदास बाबा यांनी त्यावेळी सांगितले होते. तेव्हाच पांडुरंग बाबांनी गुरुवर्य बाबांना होकार दिला. आणि दिंडी डोंगरेश्वर संस्थान वर पोहोचली. दिंडीची सांगता झाली. दुसऱ्या दिवशी निघायची तयारी होती गुरुवर्य बाबांनी पुन्हा पांडुरंग बाबा विचारलं की जाण्याची तयारी झाली की नाही. त्यावेळी महंत पांडुरंग बाबा यांनी सांगितले की बाबा तुम्हाला दिलेल्या शब्दाला मी तडा जाऊ देणार नाही. तुम्हाला दिलेला शब्द मी पूर्णच करेल. असं महंत पांडुरंग बाबा यांनी त्यांच वेळी गुरुवर्य बाबांना सांगितले होते. त्यावेळी गुरुवर्य बाबा यांनी श्री राम धर्मशाळेच्या लोकांना सांगीतले. की मी शिक्षणासाठी एक विद्यार्थी पाठवत आहे. त्याची राहाण्याची व खाण्याची व्यवस्था करा. नंतर बाबांनी सांगितले त्याप्रमाणे आळंदी येथे शिक्षण घेण्यासाठी महंत पांडुरंग बाबा तिथे पोहोचले.आणि त्याचवेळी त्यांचे नाते हे गुरु शिष्य असे झाले. पूर्ण आळंदी येथे शिक्षण घेत असताना बाबांचे सतत मार्गदर्शन हे सुरूच होते. महंत गुरुवर्य बाबांची खूप इच्छा होती की पांडुरंग बाबा यांनी या शिक्षणातून खूप मोठी मान उंचवावी. आणि बाबांनी दिलेल्या शब्दाचे महंत पांडुरंग बाबा यांनी काटेकोरपणे पालन केले . श्री विठ्ठल आश्रम संचलित स्वानंद सुख निवासी सद्गुरु जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था येथे चार वर्ष अध्ययन केले. एकूण आठ वर्षे आळंदी येथे अध्ययन केले नंतर पुढील शिक्षणासाठी वेदांत साधना स्थळी गुरुकुल लाडे वडगाव येथे अध्ययन केले. महंत पांडुरंग बाबा यांनी घेतलेले शिक्षण हे गुरुवर्य बाबांना अतिशय उत्सुकतेचे वाटले.काही वेळेस गुरुवर्य बाबांनी महंत पांडुरंग बाबा यांची बोलण्याच्या माध्यमातून परीक्षा देखील घेतली होती. तेव्हा त्याचवेळी गुरुवर्य बाबा यांच्या मनात महंत पांडुरंग बाबा यांनी घर निर्माण केले. लाडे वडगाव येथील गुरुकुल मध्ये शास्त्रीय शिक्षण सुरू होते.



दत्ता कराड
पत्रकार, सायं दै. महाराष्ट्र आरंभ

येथील शिक्षण सुरू असताना गुरुवर्य बाबांची तब्येत बरी वाटत नव्हती. त्यावेळी सतत बाबांचे येणे जाणे हे जास्तच गुरुवर्य बाबांकडे सुरू झाले. नंतर गुरुवर्य बाबांची तब्येत अतिशय खालावल्यामुळे महंत पांडुरंग बाबा यांना गुरुवर्य बाबा यांनी आपल्याकडे बोलावून घेतले. आणि पुढे गुरुवर्य बाबा यांना छत्रपती संभाजी नगर येथे जीवन आमृत रुग्णालय येथे उपचारास नेण्यात आले. पण शरीराने योग्य साथ न दिल्यामुळे बाबा यांचे तेथेच प्राणज्योत मावलळी. या दु:खातून कसे सावरायचे हे महंत पांडुरंग बाबा यांना काहीच समजत नव्हते. आपले आधारवड गुरु आपल्याला अर्ध्या वाटेवर सोडून गेले. हे दु:ख खूप वेदनादायी पांडुरंग बाबा साठी होते. परंतु गुरुवर्य बाबा यांनी या अगोदरच त्यांच्या पाठीमागे उत्तर अधिकारी म्हणून महंत पांडुरंग बाबा यांचे नाव लिहिले होते. एकदम खूप मोठी जबाबदारी गुरुवर्य बाबांनी पांडुरंग बाबा यांच्यावर सोपवली गेली. आणि त्यावेळी डोंगरेश्वर संस्थान चे उत्तराधिकारी म्हणून महंत पांडुरंग बाबा यांचे नाव घोषित केले. आणि आता हे वारकरी संप्रदायाच, सकलसंतांच व सद्गुरु श्री संत भगवान बाबा , भिमसिह बाबा,रामदास बाबा यांच्या परंपरेचा वारसा चालवण्याचे सौभाग्य महंत पांडुरंग बाबा यांना प्राप्त झाले. जे मार्गदर्शन गुरुंनी आपल्यावर केले ते काटेकोरपणे पांडुरंग बाबांचे कार्य सुरू आहे .वारकरी संप्रदाय ला धरून पुढील प्रवास हा चालू आहे. वारकरी संप्रदाय या क्षेत्रामध्ये एक स्वच्छ प्रतिमेचे व्यक्तिमत्व म्हणून महाराष्ट्रभर व बीड जिल्ह्यात महंत पांडुरंग बाबा शास्त्री यांचे नाव आदरपूर्वक घेतले जाते. ०३ जून रोजी महंत पांडुरंग बाबांचा वाढदिवस साजरा केला जातो.

**संपादक : दीपक थोरात बीड**

# राष्ट्रीय चर्मकार महासंघ निराधार,अबला अपंग कुटुंबाच्या अडीअडचणीला कायम उभा : नानासाहेब घोडके

माजलगाव । प्रतिनिधी
राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने एका अपंग कुटुंबाला मदत करण्यात आली आहे. यामध्ये या कुटुंबाला अन्नधान्य देऊन नानासाहेब घोडके यांनी मदत केलेली आहे. राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गोपीनाथ गुरव परभणी यांनी बीड येथे जिल्हापरिषद (कन्या शाळा बीड) आवारात ताडपत्री व पत्र्याच्या शेडमध्ये निर्धार, अबला, दोन्ही पायांनी अपंग चर्मकार समाजाचे पती पत्नी रहात आहेत हे त्यांना कळले आणि त्यांनी स्वत: त्यांची भेट घेतली भानुदास विठ्ठल मुजमुले वय ६२ वर्षे



मुळ गाव एकुरका ता. केज हाल्ली मुक्काम बीड हे दोन्ही पायाने अपंग आहेत.
सौ. शोभा भानुदास मुजमुले वय ५४ वर्षे या पण दोन्ही पायाने अपंग आहेत त्यांना तेजस्विनी नावाची १६ वर्षे वयाची एक मुलगी आहे ती १० वी ला आहे हे अपंग कुटुंब मुलीचे शिक्षण आणि संसाराचा गाडा परीकष्टाने चालवत आहेत या अबला निराधार कुटुंबांची परीस्थिती पाहुण त्यांच्या मनाला खुप वेदना झाल्या त्यांच्या सोबत चर्चा धीर देऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघ कुठल्याही अडचणीला पाठीमागे उभा राहिला असे बोलून त्यांना एक महिन्याची राशन पाण्याची व्यवस्था केली त्यामध्ये गहू आटा, तुरदाळ, साखर, तांदूळ, शेंगदाणे, तेल, अंगाच्या व कपड्यांच्या साबणी, चाहा पत्ती, मीठ पुढे एक किलो, दोन किलो, पाचा किलो अशा प्रमाणात त्यांना देण्यात आले.
जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सुनीलजी माने साहेब, जिल्हा सल्लागार दासराव गोरे साहेब, गोपीनाथ गुरव आणि माझे विश्वासु, हकेला धावणारे यशराज बामणे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत देऊन या कुटुंबा सोबत चर्चा करीत असताना खुप काही वाईट प्रसंग सांगितले आता थकलो आहोत. मुलीचे शिक्षण कसे करावे रहाण्यासाठी घर नाही निवारा नाही हलाखीचे जीवन जगत आहेत. समाजाकडून व शासनाकडून अपेक्षा व्यक्त केल्या. मुलीला घेऊन ह्या उघड्या आवारात रहात आहेत विशेष म्हणजे शोभा मुजमुले ह्या अपंगत्वावर मात करून एम पी एस सी परीक्षा पास आसुण ओरल आणि अपंगत्वामुळे नौकरी नाकारण्यात आली तरी पण हिम्मत देऊन आपला संसाराचा गाडा ओढत आहेत. तरी समाज बांधवांना विनंती करण्यात येते की या कुटुंबास जी काय मदत करता येईल ती करावी आणि त्यांना हाक्काची जागा कसी मीळवुन देता येईल त्यासाठी प्रयत्न करावे हि कळकळीची विनंती नानासाहेब घोडके यांनी प्रसार माध्यमातून केली आहे.



## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात शिवराज्याभिषेक सोहळा साजरा

धारूर । प्रतिनिधी
ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बाल संस्कार केंद्र, धारूर या ठिकाणी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला, यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महाराजांनी वापरलेल्या युद्धकालीन शस्त्राचे पूजन करण्यात आले.
श्रीमंतयोगी मर्दानी आखाडा, पाडळी खुर्द, कोल्हापूरचे मर्दानी खेळाचे प्रशिक्षक श्री. योगेश गुंजीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी प्रार्थना सादर केली. या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमाप्रसंगी श्री. भालेराव सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुरवसे सर, शेख सर, श्री .आशीतोष जाधव उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मुंजाराम निरडे यांनी केले.

# कर्मयोगी आबासाहेब ला कान्स चित्रपट महोत्सवात मिळाली भरभरून दाद

बीड । प्रतिनिधी
महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात असलेल्या सांगोला विधानसभा मतदारसंघात एक दोन नव्हे तब्बल ११ वेळा आमदार राहिलेले तसेच दोनदा मंत्रीपद भूषविलेले शेतकरी कामगार पक्षाचे दिवंगत गणपतराव देशमुख उर्फ आबासाहेब यांच्या जीवनावर आधारित लेखक दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी अत्यंत उत्कृष्टरित्या सादर केलेल्या कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला फ्रान्स येथील कान्स चित्रपट महोत्सवात सुद्धा भरभरून दाद मिळाली. ही बाब चित्रपटसृष्टीसह सोलापूर, पुणे आणि बीड जिल्ह्यासाठी सुद्धा अभिमानास्पद आहे. कारण या चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख हे सोलापूरचे भूमिपुत्र तर पुणे जिल्ह्याला कर्मभूमी म्हणून निवडलेले तसेच बीड जिल्ह्याचे जावई आहेत.
कर्मयोगी आबासाहेब या मराठी चित्रपटाने प्रदर्शित झाल्यापासून आतापर्यंत देशविदेशातील ३० पेक्षा जास्त प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त केले आहे. जगप्रसिद्ध कान्स फिल्म फेस्टिव्हलच्या चरीलह.र्वी ऋळश्रा (मार्शे दु फिल्म) मार्केटमध्ये आपल्या उपस्थितीची नोंद केली आहे. या चित्रपट महोत्सवात हिंदी




आणि मराठी चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले. यात कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट सुद्धा प्रेक्षकांमध्ये दाखवण्यात आला. यावेळी देश–विदेशातील दिग्गज कलाकार, दिग्दर्शक, निर्माते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा चित्रपट पाहून सर्वांनी चित्रपटाला भरभरून दाद दिली. कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट सर्वांच्या पसंतीस उतरला. सर्वांनी लेखक दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या लेखणीसह दिग्दर्शनाचेही कौतुक केले. हे कौतुक आणि हा गौरव महाराष्ट्रासह सोलापूर, पुणे आणि बीड जिल्ह्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण अल्ताफ दादासाहेब शेख हे या तिन्ही जिल्ह्यांशी निगडित आहेत. कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाची ही जागतिक झेप मराठी चित्रसृष्टीसाठी एक नवे दालन उघडणारी ठरणार आहे, यात शंका नाही.

## लिंबागणेश पोलिस चौकीतील पोलिस कर्मचाऱ्यांना पोलिस मित्रांच्या वतीने निरोप समारंभ; नविन कर्मचाऱ्यांचे स्वागत

लिंबागणेश । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील नेकनुर पोलिस स्टेशन अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकीतील बदली झालेल्या पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे, एम तांदळे यांचा पोखरी (घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक, महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दि.०६ जुन शुक्रवार रोजी पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय लिंबागणेश येथे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन पत्रकार हरीओम क्षीरसागर यांनी केले तर आभारप्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव यांनी केले. यावेळी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित विश्वंभर गिरी, ग्रामपंचायत सदस्य समीर शेख यांनी मनोगत व्यक्त केले तर सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पोलिस कर्मचारी यांनी केलेल्या प्रशंसनीय कामाचा लेखाजोखा मांडत ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात आलेले अनुभव मांडत ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल व निरोप समारंभाबद्दल आभार मानले.



पोलिस अधीक्षक बीड नवनीत कांवत यांनी बीड मधील पोलिस दलामध्ये फेरबदल करत दि.२१ मे रोजी ६०६ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या. या बदल्यांमध्ये पोलिस हेडकॉन्स्टेबल ते उपनिरीक्षक या स्तरावरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. नेकनुर पोलिस ठाणे अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकी मधील पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत यांची शिवाजीनगर पोलिस स्टेशन बीड, बाबासाहेब डोंगरे व नवनाथ मुंढे यांची अंबेजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तर मधुकर तांदळे यांची पाटोदा पोलिस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे. पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा आदरपूर्वक सन्मान करत जड अंत:करणाने निरोप देण्यात आला. यावेळी माजी सैनिक मारोती रणखांब, सय्यद बशीर, विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, बाळु कदम, तुकाराम गायकवाड, तुळशीराम पवार, बालाजी निर्मळ, जितेंद्र निर्मळ, कृष्णा वायभट, योगेश शिंदे, केशव गिरे, आदी ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची उपस्थिती होती.

नवनियुक्त पोलिस कर्मचारी यांचे स्वागत
लिंबागणेश पोलिस चौकीतील जुन्या सर्वच कर्मचाऱ्यांची बदली झाल्याने नव्याने रूजू झालेले पोलिस हेड कॉन्स्टेबल बडे, राख, शेलार आणि राऊत यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

## अंथरवन पिंपरी ग्रा.पं. व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक दिन वृक्षारोपण करून साजरा

बीड । प्रतिनिधी
दि.६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन व काल झालेला जागतिक पर्यावरण दिन या दोन्हींचे औचित्य साधून अंथरवन पिंपरी येथे ठीक सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक ध्वजारोहण करून वंदन करण्यात आले. याच निमित्ताने ग्रामपंचायत व बीड शहर बचाव मंच यांच्या यांच्या संयुक्त सहयोगातून वृक्षावरोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहर बचाव मंचाच्या वतीने २०० झाडे देण्यात आलेली आहेत व येत्या काळामध्ये ग्रामपंचायत १००० झाडे लावण्याचा उपक्रम लवकरच पूर्ण करील असा निर्धार व्यक्त करण्यात आला.
नुकतेच लोकमत समूहाच्या वतीने अंथरवण पिंपरी ग्रामपंचायतीला आदर्श सरपंच हा पुरस्कार देण्यात आला आहे. गावच्या सरपंच



शिवगंगा भाऊराव प्रभाळे या दाम्पत्यांनी गावांमध्ये फार छान कौतुकास्पद विकास कामे राबवली आहेत व अक्षरश: गावाचा कायापालट केला आहे. गावामध्ये सगळीकडे गल्लोगल्ली सिमेंट रस्ते व पेवर ब्लॉक रस्ते केले आहेत. गावामध्ये अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामस्थांच्या सर्व अडीअडचणींना प्रभाळे दांपत्य अहोरात्र उभे असते. गावामध्ये वृक्षारोपण करून गावाला हिरवे नंदनवन करण्याचीअग्रणी भूमिका या प्रभाळे दाबत्यांनी घेतली आहे. आजच्या या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला वामा चित्रपटाचे प्रसिद्ध अभिनेते महेशकुमार वनवे यांची बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी ग्लोबल वॉर्मिंग हे जगावर आलेले मोठे संकट आहे अशी चिंता व्यक्त केली. यातून वाचण्यासाठी व पुढच्या पिढीला दुष्काळासारख्या मोठ्या नैसर्गिक संकटांपासून वाचण्यासाठी गावोगाव वृक्षारोपन केले जावे हाच एक पर्याय शिल्लक आहे, असे मत व्यक्त केले.
या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला बीड शहर बचाव मंचाच्या व ग्रामपंचायत च्या वतीने नितीनजी जायभाये, सरपंच सौ शिवगंगा व भाऊराव प्रभाळे, ह.भ.प. नवनाथ महाराज हरको बाबा संस्थान, अभिनेते डॉ. ड.महेशकुमार वनवे, वनवे काका, पंचायत समितीचे वि.अ. कल्याणराव शेळके, ग्रामसेवक ज्योती लेकुरवाळे, सुधीर देशमुख, उपसरपंच अशोक शिंदे, ड.नितीन वाघमारे, रामधन जमाले, ड. प्रेरणा सूर्यवंशी, सौ. लताताई राऊत, बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, अशोकराव येडे, किशकिन्दा पांचाळ, माऊली शिंदे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.



घाटा ग्रामपंचायत कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्य अभिषेक सोहळ्यानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना सरपंच प्रल्हाद मुळीक, ग्रामरोजगार तळेकर, आप्पा झांजे, निलेश झांजे, दैनिक आरंभचे पत्रकार सुरेश कांबळे, शिपाई संभाजी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. (छायाचित्र : सुरेश कांबळे आष्टी)

## गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीत शाहरुख पठाण नावाचं वादळ उतरणार

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई शहरातील इस्लामपुरा भागांमधील सर्वसामान्यांच्या हाकेला धावून जाणारा युवा समाजसेवक शाहरुख भैय्या पठाण यंदा नगरपरिषदेचे मैदान मारणार. शाहरुख पठाण आणि आमदार विजयसिंह पंडित यांची प्रथम भेट. शालेय शिक्षण घेत असताना प्रथम भेट झाली होती आमदार विजयसिंह पंडित यांची विजयसिंह पंडित एक वेळेस गेवराई च्या कोर्टात काही कामा निमित्त आले असता शाळेतून शाहरुख पठाण घरी जात असतांना त्याला माघून विजयसिंह पंडित च्या कार्यकर्ते ने आवाज देऊन बोलाविले व भेट घालवून दिली त्या काळात स्क्रीन टच मोबाईल फार कमी होते एक असेच मोबाईल शाहरुख कडे होते आणि त्या मोबाईल मध्ये विजयसिंह पंडित यांचा काळ्या घोड्यावर स्वार दोन फोटो होते विजयसिंह पंडित यांनी पाहिले असता ते फोटो बलुटूथ च्या सहाय्याने त्यांच्या मोबाईल मध्ये घेतले तेव्हा पासून शाहरुख पठाण आणि आमदार विजयसिंह पंडित यांची ओळख झाली आणि तेव्हा पासून शाहरुख पठाण हे विजयसिंह पंडित युवा मंच सदस्य झाले आणि जोमाने कामाला लागले.
ईस्लाम पुरा तसेच गेवराई शरतील इतर भागात



शाहरुख पठाण दिन दुबळ्या युवकांच्या गळ्यातील ताईत. गेवराई नगरीतील ईस्लामपुरा भागासह विविध वार्डातील युवकांचे हृदय स्थान तथा समाज सेवक शाहरुख भैय्या पठाण म्हणजे एक कॉल प्रॉब्लेम सॉल असा हा दिलदार तरुण प्रत्येक समाजाच्या मदतीला धावतो सुख असो दु:ख असो व तसेच लग्न असो मग तो कोणत्याही समाजाचा असो त्याच्या मदतीला धावून येणारा एकच नाव समाज सेवक शाहरुख पठाण याच समाजसेवक शाहरुख पठाण साठी ईस्लामपुरा भागातील नागरिकांनी ठरविले की यंदाच्या नगर परिषदेच्या निवडणूक मध्ये आमचा प्रभागाचा नगरसेवक शाहरुख पठाणच होणार.
ईस्लामपुरा प्रभागाच्या नागरिकांचा ठराव झाला की दवाखाना असो की पोलीस स्टेशन कोणाचे भांडण तंटा मिटवायचे असेल तर कोणाच्या मुला मुलीचे लग्न असले तसेच आमच्या सुखा दुखात आमच्या मदतीला धावून येणारा आमचा शाहरुख भैया पठाण यालाच निवडून देऊ या तसेच शाहरुख भैया मित्र मंडळाच्या वतीने ही आग्रह करण्यात आलं भैय्या यंदा तुम्ही नगरपालिका लढवावी शाहरुख भैया मित्र मंडळातील तरुण आणि वार्डातील वयोवृद्ध मतदाराच्या आग्रहाखातर यंदा शाहरुख भैय्या पठाण नगर परिषदेचे मैदान मारणार.

## बीड जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना त्यांचे मूलभूत अधिकार द्या अन्यथा अर्धनग्न सत्याग्रह करणार : राजेशकुमार जोगदंड

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायत आस्थापनेतील कंत्राटी कामगार पुरवठा करणारे कंत्राटदार कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासन नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून कंत्राटी कामगारांना त्यांचे मूलभूत अधिकार द्या अन्यथा ३० जून २०२५ रोजी अर्ध नग्न सत्याग्रह रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वात होणार आहे.
याबाबत सविस्तर वृत्त असे की जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात मा. मनोज रानडे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांचे आदेश क्रमांक नपप्रसं/२०२४/ सर्व न.प.कंत्राटी कर्मचारी/ कक्ष – ६ / ५०६६ दिनांक:– २६.०८.२०२४. ची काटेकर पणे अंमलबजावणी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/५/२०२५ रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली त्याचे इतिवृत्त दिनांक २३ मे २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद नगरपंचायत यांना पाठवून त्यांच्याकडून कंत्राटी कामगार यांना देण्यात येत असलेल्या वेतनाबाबत चा व इतर सोयी सुविधांचा वस्तुनिष्ठ अहवाल मागून घेण्याचे निर्देश जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना दिलेत. कंत्राटी कामगारांचे प्रलंबित प्रश्न पुढीलप्रमाणे उद्योग, ऊर्जा, कामगार व खनि कर्म विभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ व ६ मार्च २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपंचायती वगळून या रोजगारात असलेल्या कंत्राटी कामगारांचे किमान वेतन पुनर्निर्धारित केले, त्याप्रमाणे वेतन दर महिन्याच्या १० तारखेच्या आत देण्यात यावे, किमान पगार आणि प्रत्यक्षात मिळालेला पगार यामधील फरक त्याच्या फरकाच्या दहापटीपर्यंत नुकसान भरपाई देण्यात यावी, कंत्राटी कामगारांना कर्मचारी भविष्य निर्वाह



निधीचा यु.एन.ए. नंबर देऊन मागील अनेक वर्षापासून कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची थकीत रक्कम कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यात जमा करावी, कंत्राटदारांनी दर ०६ महिन्यात कंत्राटी कामगारांना मास्क, हँडग्लोज, सेफ्टी शूज दिले पाहिजे, मात्र मागील अनेक वर्षांपासून ही अत्यावश्यक सुविधा कंत्राटदारांनी पुरवलेली नाही त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी, नगरपरिषद बीड आस्थापनेतील कंत्राटी कामगारांना दिनांक एक जून २०२३ रोजी अयोग्य व बेकायदेशीरित्या कामावरून कमी केले त्यांना पगाराच्या व कामाच्या सलगतेसह पूर्ववत तात्काळ कामावर घेण्यात यावे या सर्व मागण्या येत्या पंधरा दिवसात पूर्ण कराव्यात अन्यथा ३० जून २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करावा, या प्रमुख मागणीसह इतर मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी रोजंदारी मजदूर सेना केंद्रीय महासचिव तथा कामगार प्रतिनिधी भाई गौतम आगळे सर मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेश कुमार जोगदंड, जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड. यांच्या दालनासमोर दिनांक: ३० जून २०२५ रोजी सकाळी ११: ३० ते दुपारी ०१: ३० पर्यंत अर्धनग्न सत्याग्रह करून दुपारी ०३ वाजल्या पासून न्याय मिळेपर्यंत कार्यालयीन वेळेत धरणे आंदोलन करतील.
होणाऱ्या सर्व अनुचित प्रकारास महाराष्ट्र शासन, प्रशासनातील सनदी अधिकारी जिल्हा प्रशासन व बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत हेच जबाबदार राहतील असे दिलेल्या निवेदनात नमूद केले असून त्याच्या प्रतिलिपी संबंधित मंत्री महोदय व सनदी अधिकारी यांना ईमेल द्वारे पाठविण्यात आल्या आहेत, जिल्ह्यातील सर्व कंत्राटी कामगार वर्गाने स्वत:च्या न्याय मागण्यांसाठी अर्धनग्न आंदोलनात सामील व्हावे असे आवाहन प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड यांनी केले आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना हक्काची वाळू पोहोच: बोरदेवी येथे जिल्ह्यात सर्वात आधी घरकुल धारकाला वाळू मिळाली

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे अजुन एक लोकोपयोगी पाऊल!

बीड । प्रतिनिधी

दिनांक ६ जून रोजी नवीन शासन नियमानुसार महसूल विभागाने घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू उपलब्ध करून दिली. राजेगाव येथील सिंदफना नदीतील वाळू बोरदेवी येथील लाभार्थी कचरू भानुदासराव जाधव यांच्या जुन्या घरी टाकण्यात आली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू देण्याचा निर्णय रोजी घेतला होता. वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करून देण्यास क्षेत्रीय स्तरावर आलेल्या अडचणी, डेपोपद्धती व लिलाव पद्धती यामधील गुणदोषाबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांच्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन वाळू धोरण २०२५ च्या अनुषंगाने सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मोफत वाळूचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व जिल्ह्यात तातडीने पात्र घरकुल लाभार्थ्यांना वाळू पोहोच करावी यासाठी सुचना केल्या.

बीड महसूल विभागाने जिल्हाधिकारी श्री विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने योजना तयार केली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वत: व्हिडीओ कॉन्फरंस द्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,



गटविकास अधिकारी यांना सविस्तर सुचना दिल्या. स्थानिक आमदार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पास वितरित कराव्या अशाही सुचना दिल्या.

जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. वाळूघाटांची माहिती घेतली. त्यानुसार मंडळ अधिकारी, तलाठी यांना त्या त्या घाटात वाळू आहे काय याबाबत चाचपणी केली. शासन निर्णयानुसार गट विकास अधिकारी यांनी घरकुल लाभार्थी यांची यादी तयार करुन सदरच्या यादीमध्ये प्राधान्यक्रम ठरवून तात्काळ आवश्यक असणाऱ्या घरकुल लाभार्थी यांना मोफत ०५ ब्रास वाळू उपलब्ध करुन त्यांना वाळू वितरीत करण्यासाठी निश्चित करुन देण्यात आलेल्या वाळू घाटातूनच वाळू दिनांक ०९.०६.२०२५ पर्यंतच वाळू उत्खनन करुन देण्यात यावी. तसेच ज्या तहसिलदार यांचे कार्यक्षेत्रात वाळूघाट नाही त्यांनी निश्चित केलेला वाळू घाट हा ज्या तालुका तहसिलदार यांचे कार्यक्षेत्रात आहे, त्या तहसिलदार यांचेशी समन्वय साधून घरकुल लाभार्थी यांना वाळू उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. घरकुल लाभार्थी यांना वितरीत केलेल्या वाळूचा तपशील जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच अवैध उत्खनन होणार नाही याची दक्षता संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी घ्यावी. घरकुल लाभार्थी यांना महा-खनिज प्रणालीवरुन ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक पास (ई टी पी) तयार करुनच वाळू वितरीत करण्यात यावी, अशा स्वरूपाच्या सुचना निर्गमित केल्या.

तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी स्वत: वाळू घाटावर जाऊन पाहणी केली व वाहन आणि इतर यंत्रणेची व्यवस्था याची तजवीज होऊ शकते का, लाभार्थ्यांना जवळचा घाट (नदी) याबाबत सविस्तर माहिती घेतली. त्यानुसार सुर्डी थोट चे तलाठी पवन चव्हाण यांनी लाभार्थी कचरू भानुदासराव जाधव यांना महाखनिज पोर्टल वरून ई टी पी पास तयार करून दिला व बोरदेवी इथे वाळू पोहोच केली. यावेळी रजेगाव चे सरपंच लक्ष्मण आबुज, ग्राम महसूल अधिकारी पवन चव्हाण लाभार्थी, कचरु जाधव आणि बोरदेवी चे सरपंच रविंद्र आरसुल उपस्थित होते. घरकुल बांधकाम वाळू नसल्यामुळे थांबले होते पण आता ते पूर्ण होईल, त्यामुळे आमचे कुटुंब शासनाचे व जिल्हाधिकारी यांचे आभारी आहे असे म्हणत जाधव यांनी समाधान व्यक्त केले.

### कशी मिळेल घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू?

शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना इ. योजनाच्या लाभार्थ्यांना मोफत वाळू जवळच्या वाळू घाटातून म्हणजेच नदी, नाले, ओढे येथून नियमानुसार आणता येते. पंचायत समिती मधील घरकुल विभागाने तहसील कार्यालयास लाभार्थी यादी आधार क्रमांक, मोबाईल क्रमांकासह सादर केल्यानंतर त्यांची यादी व्हेरिफाय केली जाते. त्यांनतर प्रत्यक्ष घाटावर जाऊन लाभार्थी, तलाठी महाखनिज पोर्टल वर आवश्यक माहिती भरतात. वाहनाचा क्रमांक, ड्रायव्हरचे नाव टाकल्यानंतर एक इलेक्ट्रॉनिक पास तयार होतो. त्यावर संपूर्ण तपशील असतो. त्यांनतर लाभार्थी वाहन निश्चित केलेल्या वेळेत त्याच्या बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी घेऊन जाऊ शकतो. बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात अशा प्रकारे मोफत वाळू वाटप सुरु झाले असल्याने घरकुल धारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.




## हुतात्मा स्मारक मधील पाण्याच्या टाकीचे अनाधिकृत बांधकाम तात्काळ बंद करा : अनंत चिंचाळकर

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथील हुतात्मा काशिनाथ चिंचाळकर स्मारकात नगरपालिकेने पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू केले असून ते अनाधिकृत आहे हुतात्मा स्मारक किल्ले धारूर शहराचे वैभव असून स्मारका विषयी धारूरकरांचे भावनिक संबंध जोडलेले आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक हुतात्म्यानी बलीदान केलेले आहे. हुतात्मा काशिनाथ चिंचाळकर यांनी हुतात्म पत्करले असून त्यांचा शहर शहरवासीयांना अभिमान आहे. हुतात्मा स्मारक मधील टाकीचे बांधकाम बंद करून सदरील जागी उद्यान बांधून त्याचे पवित्र राखले जावे यासाठी अनंत चिंचाळकर सह अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी व त्यांच्या पत्नी यांनी तसेच धारूरकरांनी नगरपरिषद धारूर यांना निवेदन दिलेली आहे. या निवेदनाची दखल घेऊन न. प. मुख्याधिकारी हे अनाधिकृत बांधकाम बंद करतील अशी भावना धारुरकर व्यक्त करत आहेत.

## अंबाजोगाईत सापडला पिवळ्या रंगाचा अलबिनो साप



अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहर परिसरातील शेपवाडी भागात नुकताच पिवळसर रंगाचा दुर्मिळ अलबिनो गवत्या साप आढळला. सर्पमित्र तथा प्रा. डॉ राजकुमार थोरात यांनी यास पकडून नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. हा अलबिनो गवत्या साप सहसा हिरव्या रंगात असतो, पिवळ्या रंगात तो फार क्वचित आढळतो.

अंबाजोगाई शहर व ग्रामीण भाग हा जैवविविधतेने नटलेला भाग आहे. त्यामुळे या भागात वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी, प्राणी, वनस्पती आणी सरपटणारे प्राणी आढळतात. शेपवाडी परिसरातील अलबिनो गवत्या साप साप निघाल्याचे कळताच, डॉ.राजकुमार थोरात यांनी त्यास पकडून निसर्गार्पण केले. या सापाचा अधिवास शेतातील गवतामध्ये असतो. उंदीर, बेडूक हे त्याचे खाद्य आहे. तो गावातसारखा हिरवा असल्यामुळे त्याला गवत्या म्हणतात. तो बिनविषारी असतो, याची लांबी २ ते ३ फूट असते. अंबाजोगाई परिसरात प्रथमच पिवळसर रंगाचा असा साप आढळल्याचे प्रा. राजकुमार थोरात यांचे म्हणणे आहे.

## पोलिस अधिकारी सुपेकरांनी जेलमधील आरोपीकडून ३०० कोटी मागितल्याची तक्रार माझ्याकडे : आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

पोलिस अधिकारी लाख रूपयांचा चेक घेतो, पन्नास हजाराचा मोबाईल सप्रेम भेट घेतो. या अधिकाऱ्यांच्या अनेक तक्रारी असून त्यांनी जेलमधील आरोपीकडून ३०० कोटी मागितल्याची गंभीर तक्रार देखील माझ्याकडे आल्याचे वक्तव्य आ.सुरेश धस यांनी केले आहे.



आष्टी नगरपंचायत येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना आ.धस.म्हणाले की, वैष्णवी हगवणे प्रकरणाशी संबंधित पोलीस अधिकारी सुपेकरांनी जेलमधील आरोपींकडून ३०० कोटी रुपयांची मागणी केल्याची तक्रार माझ्यापर्यंत आल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला. नातेवाईकांच्या सुनेकडून तुम्ही पैसे मागता. म्हणजे तुम्ही फॉल्टी आहात. त्यांच्यात नैतिकता नाही. आता दीडशे कोटी रुपयांच्या प्रॉपर्टीचे काय करायचे? बाहेर आले तर यांना लोक शेण हाणणार, काही लोकांनी टमाटे हाणले मात्र त्याने काही होणार नाही. हे बाहेर आल्यावर यांना कवट मारले पाहिजे असे धस म्हणाले. भविष्यात आष्टी मतदार संघाने हगवणे कुटुंब जामिनावर सुटले तर त्यांच्यासाठी एक गाडी आणि कवट तयार ठेवा, असे आवाहन धस यांनी जाहीर कार्यक्रमात केले आहे. तर आयजी पोस्ट वरील माणूस अस करत असेल तर यामागे कसलीच नैतिकता राहिली नसून ती ढासळत चालल्याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे देखील धस म्हणाले.

## माजलगावात जबरी घरफोडी; पंधरा लाखांचा ऐवज लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील विवेकानंद नगर या भागात मंगळवारी पहाटे अज्ञात चोरट्यांनी वंद असलेलं घरफोडून सोन्या-चांदीचे दागिने व एक दुचाकी असा पंधरा लाखांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहरातील बसस्थानक जवळील विवेकानंद नगर भागात सादोळा येथील शेतकरी प्रताप काशिनाथ सोळंके हे राहतात ते सोमवारी दि.२ परभणी येथे कामानिमित्त गेले होते. घरी कोणीच नसल्याने घर वाहेरुन बंद होते. हीच संधी साधून अज्ञात चोरट्यांनी मंगळवारी पहाटे दोन ते साडेतीन दरम्यान त्यांचे घरात घुसून लोखंडी कपाटाचे लॉक तोडून आतील सोन्याचे गंठण, कानातील फुले, अंगठ्या, झुमके, चैन, चांदीचे ग्लास शिक्के, समया असाजवळपास २५ तोळे सोने व २५ तोळे चांदी, पितळी समया, भाडेकरू दिनेश तोर यांची एक युनिकॉर्न दुचाकी मिळून १५ लंपास ऐवज केला. घर फोडल्याची माहिती किरायदाराने सोळंके यांना दिली. माहिती मिळताच ते माजलगावात पोहोचले तर पोलिसांनी श्वान पथक व ठसे तज्ञांना पाचारण केले होते. अद्याप तरी पोलिसांच्या काही पुरावा हाती लागलं नाही. पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद मुंडे हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

## चौसाळा येथुन चोरी गेलेली मोटारसायकल चौसाळा बायपासला मिळुन आली

### चौसाळा बायपासला चेकपोष्ट होणार का?

बीड । प्रतिनिधी

नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीतील चौसाळा बायपास वरती सध्या चोरटयाचा हैदोस पाहायला मिळत असुन एकटा दुचाकी चालक दिसला की त्याला अडवुन त्याच्या कडील रोख रख्खम काढुन घेणे असे प्रकार या बायपासवरती घडताना दिसुन येतात जर यालोकाना काहीच साध्य नाही झाले तर आसपास असलेल्या मोटारसायकलची चोरी करणे, तसेच शेतकरयाचे सामान किंवा गुरे चोरून घेवुन जाणे हे नित्यनियमाचे बनले आहे असाच प्रकार आठ दिवसापुर्वी चौसाळा पोलीस चौकीच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या प्राचार्य भिलारे सर यांच्या घरातील भाडेकरू विठ्ठल नांदे युनिकॉर्न कंपनीची मोटरसायकल चक. २३.इऊ४९३७ ही चोरीला गेली होती गुरुवारी रात्री पहाटेच्या दरम्यान ही मोटरसायकल चौसाळा बायपास वरती मिळून आली आहे.

सदरील मोटरसायकल चोरट्यांनी या ठिकाणी सोडून दिलेली आहे ही मोटरसायकल चौसाळा पोलीसानी ताब्यात घेतली असून पुढील तपास चौसाळा पोलीस करत आहेत परंतु या बायपास वरती चेक पोस्ट होणे गरजेचे असून या बायपास वरती चेक पोस्ट तात्काळ देण्यात यावे अशी मागणी चौसाळा येथील सर्वसामान्य नागरिक बोलून दाखवत आहेत.

## धारूर तालुक्यातील चारदरी रस्त्यावर दरड कोसळली; रस्त्यावर आले मोठे दगड, अपघात होण्याचा धोका

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील ढगेवाडी नजीक चारदरी रस्त्यावर दरड कोसळली आहे या दरडीतील मोठे दगड रस्त्यावर आले आहेत यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे तसेच अपघात होण्याचा धोका वाढला आहे या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

तालुक्यातील चारदरी हे हनुमान भक्ताचे मोठे गाव आहे या ठिकाणी मोठे हनुमान मंदिर असून प्रत्येक शनिवारी दर्शनासाठी मोठी गर्दी असते याच रस्त्यावर ढगेवाडी



गावाच्या नजीक दरड कोसली आहे या डोंगरावरील मोठे मोठे दगड रस्त्यावर आले आहेत सुदैवाने अपघात झाला नाही. परंतु सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत अचानकपणे आणखी दरड कोसळून अपघात होऊ शकतो यासाठी प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन यातील मोठे दगड बाजूला करावे जेणेकरून अपघात होणार नाहीत परंतु या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे तसेच लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

अपघात होऊ नयेत यासाठी त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे. या रस्त्यावर नेहमीच मोठी वर्दळ असते भाविक भक्त तसेच चारदारी गावातील सर्व नागरिक त्याचबरोबर कोठरबन परिसरातील लोकही याच मार्गाने जातात यामुळे येथे वर्दळ असते. येथे अपघात होऊ नये यासाठी त्वरित प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिक करत आहेत.

## डोईठाण-आष्टी रोडवरील बावी येथील धोकादायक पुलाचे काम कधी होणार : गाढवे



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याला जोडणारा डोईठाण ते आष्टी हा रहदारीचा रस्ता मानला जातो. या रस्त्यावरील बावी या ठिकाणी खूप वर्षापूर्वीचा जुना दगडी पूल अजूनही तसाच आहे, या रस्त्याचे मागच्या वर्षी डांबरीकरणाचे काम झाले, त्यामध्ये शेजारचा एक पूल बनवण्यात आला परंतु हा पुल अजूनही तसाच आहे, आता तो धोकादायक स्वरूपाचा झाला आहे, त्यावर मोठे खड्डे पडले आहेत.



दगडी पुल असल्याने दगडे ही वर आले आहेत त्यामुळे त्यावरून ये-जा करणाऱ्याला त्याचा त्रास होत आहे. त्याचबरोबर त्याची उंची खूप कमी झाल्याने वरच्या पाणलोट क्षेत्रात थोडासा जरी पाऊस झाला की पुलाच्या वरून पाणी जाते त्यामुळे देखील मोठा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याचे मागील वर्षी डांबरीकरण झाले, आणि त्याच्या लगतचा सिमेंट कॉंक्रीट चा मोठा पूलही झाला, मग ह्या एका धोकादायक पुलाचे बांधकाम का करण्यात आले नाही असा सवाल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते विजय गाढवे यांनी उपस्थित केला जात आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने ह्या पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून या धोकादायक पुलाचे लवकर बांधकाम करावे, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते विजय गाढवे यांनी केली.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गिरगाव चौपाटीवर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा कर्मचाऱ्यांसोबत स्वच्छता मोहिमेत सहभाग

मुंबई । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबईतील प्रसिद्ध गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. वसुंधरेच्या संरक्षणासाठी पर्यावरण विभागाने पाऊले उचलली असून नागरिकांनी एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी केले.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निर्मूलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांच्यासह विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी व सामान्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी श्रीमती मुंडे व श्री. कदम यांनी गिरगाव चौपाटीची पाहणी करून या ठिकाणी कशा प्रकारे स्वच्छता केली जाते याची माहिती घेतली. तसेच यावेळी त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छताही केली.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पर्यावरण व वातावरणीय बदल आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्यावतीने राज्यात २२ मे पासून एकल वापर प्लास्टिक मुक्तीसाठी मोहिम राबविण्यात येत आहे. एकल वापर प्लास्टिकला नाही म्हणायचे आहे, त्याचा वापर पूर्णपणे बंद करायचे आहे. आहे त्या प्लास्टिकचा पुनर्वापर कसा करायचे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी विविध ट्रस्टचा सहभाग घेत आहोत. विविध धार्मिक स्थळ, रुग्णालये, वैद्यकिय दुकाने आदी विविध ठिकाणी प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी जनजागृती करत आहोत. झाडे लावून ती जतन करा, प्लास्टिकचा वापर करणे टाळा, पाण्याची बचत करा, सौरऊर्जा, सायकल वापरणे यासारख्या पर्यावरणपूरक पर्यायांची निवड करा, कापडी पिशव्या वापरा याबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी विविध संस्थांनी पथनाट्याद्वारे एकल वापराच्या प्लास्टिक बंदीसंदर्भात जनजागृती केली. यावेळी मुक्ताई घनकचरा व्यवस्थापन सेवा संस्था या संस्थेचे सदस्य तसेच जोशीबेडेकर महाविद्यालयासह विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकल वापराच्या प्लास्टिकविरुद्ध घोषवाक्याद्वारे जनजागृती केली व चौपाटीतील कचरा स्वच्छ करून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT